# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024



निवड झालेले विद्यार्थी.

# इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणच्या १२ विद्यार्थ्यांची इंडस्ट्रियल ट्रेनिंगसाठी निवड

पाटण, दि. ३१ : कोर्टयार्ड मॅरिअट येथे झालेल्या कॅम्पस मुलाखतीत येथील कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणच्या १२ विद्यार्थ्यांची इंडस्ट्रियल ट्रेनिंगसाठी निवड करण्यात आली आहे. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटची स्थापना २०२२ साली झाली असून कॉलेजचे हे प्रथम वर्ष असून अल्पावधीतच हे उत्तुंग यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, संस्था अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, प्राचार्य चेतन सावंत यांनी अभिनंदन केले.

इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये दहावी, बारावी तसेच पदवीनंतर डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाते. कोर्स पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंट हे कॉलेजमार्फतच दिले जाते. देशात व परदेशात ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंट उपलब्ध करून देण्याची सुवर्णसंधी कॉलेजमार्फत करून देण्यात येते. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट हे सातारा जिल्ह्यातील पहिले आयएसओ (९००१:२००५) मानांकित कॉलेज आहे. सुसज्ज क्लास रूम, डिजिटल मल्टिमीडिया रूम, ट्रेनिंग किचन, रेस्टॉरंट, बँक्वेट हॉल, फ्रंट ऑफिस, हाऊसकीपिंग रूम, ऑडिटोरिअम हॉल, लायब्ररी, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब, मुले व मुलींसाठी स्वतंत्र होस्टेल, उच्च अनुभवी शिक्षक वर्ग अशा सर्व सोयींनी परिपूर्ण सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची व पालकांची अल्पावधीत पसंतीस आलेले हे मॅनेजमेंट विद्यालय आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना अमोल चव्हाण, समीर सपकाळ, भरत कांबळे आणि शिक्षकेतर वर्ग यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक - ऐक्य
दिनांक - 1/0
वार - शनि
पान नं 08